**KNOWLEDGE FLAME**
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)

# लिंगायत-वीरशैव साहित्य चळवळ: एक अवलोकन

**प्रा. गादगे लक्ष्मण शंकर**
मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, अंबड, जि. जालना.
मो. ९८५०७५५३१६

**प्रास्तविक**

मध्ययुगीन मराठी समाज धर्मकेंद्रीत असल्याने मध्ययुगीन मराठी साहित्यही धर्मपर आहे या काळातील मराठी प्रतिभावंत कोणत्या ना कोणत्या धर्म संप्रदायाचे आहेत. चक्रधर, ज्ञानेश्वर, मुकुंदराज, नामदेव हे महाराष्ट्रातील मराठी वाङ्मयाचे आघाडीची निर्मा आहेत. तथापि महाराष्ट्रात नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त आणि समर्थ या संप्रदायांचा अशा दृष्टीने काही अभ्यास झालेला आहे. परंतु सूफी, ख्रिस्ती, जैन, शैव, वीरशैव, नागेश, गाणपत्य, आनंद, माध्व, रामानुज इ. संप्रदायांच्या अभ्यासाकडे आपले म्हणावे तसे लक्ष गेलेले दिसत नाही. परिणामी इतर साहित्याकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट जाणवते. "भारतीय धर्मजीवनात केवळ वैदिक किंवा हिंदु नाहीत तर त्यांच्याशिवाय बौध्द आहेत, जैन आहेत, ख्रिश्चन आहेत, महाराष्ट्रात व दक्षिणेला कर्नाटकात वीरशैव आहेत. या सर्वांनी मराठी धर्मजीवन आणि वाङ्मय समृध्द केले आहे. महाराष्ट्रात नाथ, महानुभाव, वारकरी या संप्रदायांनी मराठी साहित्यधारा संपन्न केली आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीला हातभार लावला. तसाच या जडणघडणीत वीरशैव संप्रदायाचाही मोठा वाटा आहे. आजवर दुर्लक्षित राहिलेले वीरशैवाचे मराठी वाङ्मय जसजसे प्रकाशात येत गेले आणि त्याचे अध्ययन सुरु झाले तसतसे वीरशैव संप्रदायाचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील स्थान निश्चित होत गेले. वीरशैव मराठी वाङ्मयाचे एक अज्ञात दालन आज अध्ययनासाठी खुले झाले आहे. अलिकडे अनेक संशोधक अभ्यासकांनी या संप्रदायाच्या वाङ्मयाचे अध्ययन- संशोधन करुन खऱ्या अर्थाने दुर्लक्षित असलेल्या या संप्रदायालाच प्रकाशात आणण्याचे कार्य केले आहे.

**अनुबंध : महाराष्ट्र आणि कर्नाटक**

भाषावार प्रांतरचने नंतरचा महाराष्ट्र आज आपल्या डोळयासमोर आहे. भाषेच्या सीमारेषा जेवढया व्यापक असतात तेवढयाच त्या पुसटही असतात. कर्नाटकात बेळगाव- गुलबर्ग्यापर्यंत जशी आजही मराठी भाषा बोलली जाते तशीच महाराष्ट्रात उदगीर - लातुर पर्यंत कन्नड भाषाही बोलली जाते. नद्यांचे काठ आणि पर्वतांच्या रांगा राज्याची भौगोलिक मर्यादा ठरवू शकत असल्या तरी ती भाषेची मर्यादा ठरवू शकत नाही. म्हणून आजचा महाराष्ट्र डोळयासमोर ठेवून मध्ययुगीन कालखंडातील कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यातील अनुबंध सांगता येणार नाही. त्यावेळचा महाराष्ट्र आजच्यापेक्षा वेगळा होता. कानडी- राज्यकर्त्यांनी आजच्या महाराष्ट्रातील काही भागात सत्ता विस्तार केला होता, तर मराठी राज्यकर्त्यांनी आजच्या कर्नाटकात सत्ता निर्माण केली होती. त्यामुळे दोन्ही प्रांतात राजकीय आणि सांस्कृतीक देवाण-घेवाण मोठया प्रमाणात चालू होती. बसवेश्वरांच्या क्रांतीचे केंद्र कल्याणी (बसवकल्याण) हे मराठी सीमेला लागून होते; एवढेच नव्हेतर डॉ. पी.बी.देसाईच्या मते, “महाराष्ट्रातील मंगळवेढे ही बसवेश्वरांची आद्यकर्मभूमी असुन तेथेच त्यांनी नवसमाज निर्मितीच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. १२ या विधनावरुनच परिवर्तनाची प्रक्रिया महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात बाराव्या शतकातच सुरु झाली असे स्पष्ट होते. म्हणूनच भारताच्या इतिहासात बाराव्या शतकात एवढया मोठया स्वरुपाची धार्मिक आणि सामाजिक चळवळ इतरत्र कुठेही दिसत नाही. “महाराष्ट्र-कर्नाटकाच्या इतिहासातली हीच पहिली परिवर्तनवादी क्रांतीकारी चळवळ म्हणून लक्षात घ्यावी लागेल.”

**वीरशैव लिंगायत : वाद-विवाद**

असे असले तरी बसवपूर्वकाळात महाराष्ट्रात वीरशैवांचे वास्तव्य असल्याचे आणि सुप्रतिष्ठित संप्रदायापैकी एक म्हणून वीरशैवाचे स्थान अनेक पुराव्यानिशी स्पष्ट होते. विदर्भातील साखरखेर्डा (जि. बुलढाणा) येथील पलसिध्दमठांची परंपरा ही दहाव्या शतकातील असल्याचे अनेक पुरावे आज उपलब्ध झाले आहेत. पलसिध्द हे वीरशैव धर्मप्रसारास १८०

आहे. म्हण म्हणजे त्यापुर्वीच येथे या संप्रदायाचा प्रचार-प्रसार झाला असावा हे लक्षात येते. तसेच आठव्या शतकातील 'श्रसिध्दान्तशिखामणी' हा रेणुकाचार्याचा ग्रंथ लक्षात घेता येईल. वीरशैव संताचे अध्वर्यू मन्मथस्वामी यांनीही बसवेश्वरपूर्व काळात हा धर्म संप्रदाय असल्याचे म्हटले आहे.

"कोन्ही म्हणती शिवाचार नवा झाला | बसवेश्वरापासुनी विस्ताराला
तरी ते नेणोनी बोलती बोला | अज्ञानपणे |
जहिचा शिव तहीचा शिवाचार | नवा झाला म्हणती ते पार
धर्म वीरशैव रसातळी जाता झाला बसवत्राता शिवरुपी |४

परंतु आजमात्र वीरशैव लिंगायत संप्रदायात दोन परंपरा दिसतात. एक पंचाचार्याची परंपरा या परंपरेत पाच पंचाचार्यांना या संप्रदायाचे मूळ मानले तसेच ही परंपरा वैदिक धर्माकडे झुकलेली दिसते असे ते वीरशैव; ऐवजी लिंगायत म्हणून घेतात, बसवेश्वरांनाच संस्थापक मानतात आणि वैदिक परंपरेला पूर्णपणे नाकारतात अशी ही अवैदिक लिंगायत चळवळ. त्यामुळे वीरशैव की लिंगायत, वैदिक की अवैदिक हा वादग्रस्त प्रश्न निर्माण झाला. प्राचीन अर्वाचीन ग्रंथाच्या आधारे दोन्ही बाजुचे समर्थन करता येईल. परंतु त्यामुळे मूळ प्रश्न सुटत नाही तर अनुत्तरीत राहतो. या दृष्टीने म. पु. पाटील यांचे मत विचारात घेता येईल, "तत्वज्ञानाच्या दृष्टीने पाहिल्यास वीरशैव सिध्दांताला वेदोपानिषदांचा व शैवागमांचा साधार आहे. या अर्थाने वीरशैव वैदिक पंथ आहे; परंतु वेदोक्त चातुर्वर्ण्य व यज्ञयाग- कर्मकांड यांना विरोध करणारे सर्व पंथ अवैदिक आहेत, अस अर्थ करावयाचा असेल तर वीरशैव पंथ निःसंशय अवैदिक आहे"" याच मताला अ.ना.देशपांडे ही पुष्टी देतात की, "वीरशैवसंप्रदाय हा या देशातला एक प्राचीनतम अवैदिक संप्रदाय आहे" म्हणजे बसवेश्वर या संप्रदायाचे संस्थापक नसले तरी त्यांनी त्यात आपल्याकाळी बाराव्या शतकात चैतन्य ओतलेले आहे व त्यामुळे वीरशैव संप्रदायात नवा उत्साह, नवी जागृती संचली, बसवेश्वरांनी चन्नबसवेश्वरांच्या साहाय्याने मूळच्याच उदारमतवादी, मानवतावादी वीरशैवधर्माची अहिंसेच्या व भक्तीच्या पररममंगल, परमकल्याणकारी अशा अधिष्ठानावर संघटना केली. र. बा. मंचरकर म्हणतात त्याप्रमाणे "बसवेश्वर वीरशैव संप्रदायाचे संस्थापक नसून त्याला क्रांतीकारक वळण देणारे धर्मधुरीण होत तर लिंगायत हा शब्द वीरशैवाचा पर्यायवाचक शब्द आहे" असेही ते नमूद करतात.

बसवेश्वरांनी वीरशैव संप्रदायात सामाजिक आशय ओतला. त्यांचे हे कार्य अत्यंत मोलाचे असले तरी महाराष्ट्रातील वीरशैव संप्रदाय मात्र परंपरेशी जवळीक साधून आहे. परंपरेला विरोध केल्यामुळे बसवानुयांना सामाजिक संघर्षात बळी पडावे लागले. परंतु महाराष्ट्रात वारकरी पंथाशी संमातर अशी वाटचाल करणाऱ्या वीरशैव अनुयायावर मात्र तशी वेळ आली नाही. समन्वयशील आणि परंपरा जपणाऱ्या या वृत्तीतच मराठी वीरशैव संताच्या कार्याचे यश सामावलेले दिसते.

बसवेश्वरांचा काळ बारावे शतक तर मराठी वीरशैव संताचा काळ सोळावे शतक. बाराव्या शतकात भारतीय साधनेच्या क्षेत्रात शुध्दीकरणाची जी चळवळ संबंध हिंदुस्थानात सुरु झाली तिचे नेतृत्व बसवेश्वर - अल्लमप्रभु यांनी स्वीकारले. बसवेश्वरांच्या दृष्टीसमोर नवसमाज निर्मितीचे एक स्वप्न होते आणि हाती राजदंड देखील होता. म्हणून रुढींना मुठमाती देऊन 'कायकवे कैलास' ह्या श्रममंत्राच्या बळावर नवसमाजाची पायाभरणी त्यांनी केली. परंतु त्यानंतर जो हिंसेचा आगडोंबा उसळला त्याने कर्नाटकातील धार्मिक इतिहासाची पाने रक्ताळली आणि बसवेश्वरासह त्यांच्या अनुयांना परागंदा व्हावे लागले. म्हणजेच कर्नाटकातील आणि महाराष्ट्रातील प्रश्न वेगवेगळे होते, काळही भिन्न होता. जे प्रश्न बसवेश्वरांच्या समोर नव्हते ते प्रश्न मराठी वीरशैव संतासमोर होते. अस्मानी सुल्तानीचे भयावह संकट, महानुभाव वारकरी पंथाचे आकर्षण यातून वाट काढीत वीरशैव संप्रदाय टिकवायचा होता. काळाचे हे आव्हान स्वीकारायचे होते; आपल्या संजीवक वाणीने स्वधर्मपालनाचा उद्घोष करुन वीरशैवांच्या मनातील धर्मबुध्दी सतत जागती ठेवायची होती आणि प्राणापलिकडे या संप्रदायाची जपणूक करायची होती. म्हणूनच तत्कालीन इतर संप्रदायाकडे आकृष्ट झालेल्या वीरशैवांना ज्या बाबीमुळे त्या संप्रदायाचे आकर्षण वाटले तया बाबी वीरशैव संतांना आपल्या संप्रदायात सामाविष्ट कराव्या लागल्या. तसे केले नसते तर महाराष्ट्राच्या पटावरुन काळाने वीरशैव संप्रदाय सहज पुसून टाकला असता. सैध्दान्तीक दृष्ट्या कर्नाटकातील लिंगायत आणि महाराष्ट्रातील वीरशैव संप्रदाय एकच असला तरी महाराष्ट्रातील वीरशैव संप्रदाय मराठी मातीशी अनुबंध राखून असल्यामुळे कर्नाटकातील लिंगायतापेक्षा वेगळा दिसतो एवढे नमूद करावे लागेल.

**समाजपरिर्वनाचे अध्वर्यु : म. बसवेश्वर**

काळाच्या मर्यादा झुगारुन बसवेश्वरांनी बाराव्या शतकातील सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक चळवळीचे नेतृत्व झुंजारपणे केले. "एका अर्थाने भारतीय भक्ती साहित्याच्या इतिहासात उभी राहिलेली शिवशरणांची (वीरशैव लिंगायत) चळवळ ही पहिली जनचळवळ म्हणावी लागेल.' महाराष्ट्रातही संथ गतीने का होईना समन्वयाची भूमिका घेत जगदगुरु

पलसिध्दाव मन्मथस्वामी आदि मराठी वीरशैव संतानी ही चळवळ जोमाने सुरु ठेवली, व मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली. एकूण मराठी वीरशैव वाङ्मयाचा परामर्ष घेता लक्षात येते की, आध्यात्मिक आशय आणि त्यांची अभिव्यक्ती यांचे वळण या. बाबतीत वीरशैव संत आणि वारकरी संत यातील साम्य लक्ष वेधून घेते. हे साम्य असले तरी वीरशैव संताच्या वाङ्मयातील भावसंपदा ही त्यांची स्वतःची आहे, पाट वारकरी संताच्या वाङ्मयासारख भासत असला तरी त्यातून वाहणारे पाणी स्वतंत्र जिवंत झऱ्याचे आहे. हा झरा अपार शिवभक्तीचा आहे. त्यात महाराष्ट्रातील चौदाव्या शतकात – विश्वनाथ, शिवलिंग, रामलिंग, रेवणासिध्द, भोजलिंग, तर सोळाव्या शतकातील शांतलिंगस्वामी, मन्मथस्वामी, शिवलिंग, लिंगेश्वर, बसवलिंग, महादेव, लक्ष्मण महाराज, शिवदास, गुरुदास, चन्ना बाळबुवाकबाडी, शंकरमृगेंद्रस्वामी, शिवगुरुदास, बसवदास, भावंडीबाई आदी वीरशैव कवीनी विपूल वाङ्मय निर्मिती केली.

भारतातील पुरोहितवर्गाने धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने बहुजन समाजाचे शोषण केले, त्यांना छळले, त्यांची फसवणुक केली. या अन्यायाविरुध्द बसवेश्वर आणि त्यांच्या अनुयांयाना संघर्ष करावा लागला. बसवेश्वरांचा विश्वास वेदावरही नव्हता आणि देवावरही नव्हता माणसांच्या अंतर्यामी असलेल्या परमेश्वराला ओळख असे ते सांगत असत. त्यांनी समता, प्रेम आणि बंधुत्व शिकविले, माणुसकी आणि बंधुप्रेम शिकविले म्हणून बसवेश्वर पुरोगामी व परिवर्तनवादी विचाराचे वाटतात. म. बसवेश्वर 'बोले तैसा चाले' असे संतश्रेष्ठ होते. विचाराकडून आचाराकडे, ज्ञानाकडून विज्ञानाकडे, विज्ञानाकडून विवेकाकडे, सहानुभुतीकडून सहकार्याकडे, सदभावनेकडून सदसदविवेकबुध्दीकडे, अंतरंग शुध्दीकडून बहिरंग शुध्दीकडे

बसवेश्वरांनी समानतेचे विचार सांगून लोकशिक्षकाची भुमिका पार पाडली व माणसाच्या मनामध्ये परिवर्तन केले. समाजातील सर्व घटक समान आहेत हा समतावादी, पुरोगामी विचार त्यांनी मांडला. बाराव्या शतकात ही परिवर्तनाची एवढी मोठी प्रक्रिया घडली याची पौर्वात्य व पाश्चात्य अभ्यासकांनाही आश्चर्य वाटले. धर्म म्हणजे जगण्याची आणि आचरण करण्याची पध्दत अशी कल्पना बसवेश्वरांनी प्रस्तूत केली. म्हणून बसवेश्वराचा विचार समाजसुधारक, साहित्यीक व धर्मपरिवर्तनवादी म्हणून करावा लागेल. महाराष्ट्राचे ज्ञानकोशकार व विदवान डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर म्हणतात- "बसवेश्वरांचे कार्य महान होते. त्यांच्या सिध्दांताचा प्रसार भारतात सर्वत्र झाला असता तर आज ज्या सुधारणासाठी प्रयत्न चालु आहेत त्या . आमलात आणण्याचे श्रेय बसवेश्वरांना लाभले असते"

**उपसंहार :**

"बसवेश्वराने लोकांच्या सामाजिक दृष्टीत आमुलाग्र बदल घडवून आणला होता आणि लोकांच्या मनात क्रांतीचे बीज पेरले होते. तात्काळ क्रांतीचे फळे दिसू लागली परंतु कालातंराने वीरशैव धर्मसुध्दा एक संघटीत धर्म बनला आणि इतर धर्माप्रमाणेच बंदिस्त, उतरंडी मानणारा आणि संस्थाबध्द असा धर्म झाला." नंतरच्या काळात निःसंशय तो अधिक लोकप्रिय करण्याचे प्रयत्न झाले. परंतु एक सामाजिक चळवळ न राहता संघटीत धर्म म्हणूनच त्याचा प्रचार झाला; बसवेश्वरांनी आपल्या अनुयायांना मंदिरात जाण्यापासून परावृत्त केले होते, स्त्रियांना अग्रणी राहण्यासाठी आणि सामाजिक व्यवहारात भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या अनुयायांनी हया शिकवणीकडे आणि इतर विचारांकडे दुर्लक्ष केले; म्हणून वीरशैव समाज बसवांच्या आदर्श स्वप्नातील समाज नसेलही कदाचित. परंतु कुठल्या प्रेषिताची स्वप्ने त्यांच्या धर्माने आणि समाजाने पूर्ण केली आहेत? तसे असले तरीही बसवेश्वराच्या शिकवणीचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला तर त्यांच्या विचारांची आजही प्रस्तुतता असल्याचे आपल्याला जाणवेल. याचा प्रेमाचा संदेश, सत्याचा आग्रह, दयाशीलता आणि माणसा माणसातील समानतेचे तत्व, कार्यकाविषयीचा सर्व समाजाला बंधनकारक केलेला आग्रह, त्यांची समाजवादी दृष्टी, त्यांचे गरीबावरचे प्रेम आणि पददलिताविषयीची कणव केवळ भुतकाळातील माणसाची शिकवण म्हणून झटकून टाकता येणार नाही.

**संदर्भ सूची**

१. र. बा. मंचरकर, धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन,
२. पुणे पृ.क्र.२०९
३. शे.दे. पसारकर, श्री लक्ष्मण गाथा, श्री लक्ष्मण गाथा, प्रकाशन समिती, आष्टी, पृ.क्र.१३
४. सोमनाथ रोडे - बसवसिध्दांत, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी जि..
५. बिदर, पृ.क्र.६६
६. माधव मोरे, शिवयोगी संत मन्मथस्वामी, हरणाई प्रकाशन, नांदेड पृ.क्र.१५.
७. शे. दे. पसारकर - श्री लक्ष्मण गाथा, श्री लक्ष्मण गाथा, प्रकाशन समिती, आष्टी, पृ.क्र.१५
८. अ.ना.देशपांडे, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग - ३ व्हीन्स प्रकाशन पुणे, पृ. क्र. १७१

९. र.बा.मंचरकर, धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्‌मय, प्रतिमा प्रकाशन,पुणे पृ.क्र.२११
१०. अशोक कामत, बसवसिध्दांत, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी, जि. बिदर पृ.क्र.७६
११. गंगाधर पटणे - बसवसिध्दांत, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी जि. -बिदर पृ.क्र.१३३
१२. एम.चिदानंद मुर्ती - श्री बसवेश्वर, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया पृ.क्र ७०.